# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | मंगळवार, दि. 3 डिसेंबर 2024 | पान- 1


# नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी क्लायमेट बजेट काळाची गरज : चंद्रकांत इंदलकर

## प्रशिक्षण सत्रात मार्गदर्शन करताना इंदलकर बोलत होते. : आकुर्डी येथील ग.दि.माडगुळकर नाट्यगृह येथे प्रशिक्षण सत्राचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

वेगाने बदलणारे जागतिक हवामान, त्याचा पर्यावरण आणि मानवावर होणारा परिणाम लक्षात घेता पर्यावरणाचा समतोल साधत नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी नियमित अर्थसंकल्पात पर्यावरणीय अर्थसंकल्पाचा समावेश करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२५-२६ पासून नियमित अर्थसंकल्पासोबत पर्यावरणीय अर्थसंकल्प सादर करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना आवश्यक असलेले प्रशिक्षण देण्यासाठी आकुर्डी येथील ग.दि.माडगुळकर नाट्यगृह येथे आज पासून प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण सत्रात मार्गदर्शन करताना इंदलकर बोलत होते.



यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी आनंद गायकवाड, लेखाधिकारी सुरेंद्र देशमुखे, अनिल पासलकर, चारूशीला जोशी, दीपक गायकवाड, सह शहर अभियंता संजय खाबडे, बाबासाहेब गलबले, उप आयुक्त राजेश आगळे, सीताराम बहुरे,सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी शीतल वाकडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, पर्यावरणीय बदल तज्ञ प्रज्ञा ठाकूर, सल्लागार लिशा बेंदी, डॉ. जयदीप पुरोहित, पियुष भुसारी, इशा पानसे यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अभियंता, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पर्यावरणाचा समतोल राखणे आणि संवर्धन करणे यासाठी जागतिक पातळीवर सर्वसमावेशक प्रयत्न करण्यात येत आहेत. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी भारताने देखील विविध आंतरराष्ट्रीय करारांवर स्वाक्षरी केली आहे. त्यानुषंगाने औद्योगिकनगरी असलेल्या पिंपरी चिंचवड शहरात पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि शहराच्या शाश्वत विकासासाठी महापालिकेच्या वतीने पर्यावरणीय अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. त्यामुळे शहरातील पर्यावाराने संतुलना बरोबरच नागरिकांचे जीवनमान देखील उंचावण्यास मदत होणार असल्याचे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी मांडले.

महापालिकेच्या विविध विभागाच्या वतीने शहरात विकासाच्या दृष्टीने विविध प्रकल्प उभारले जातात तसेच नागरिकांच्या कल्याणाच्या दृष्टीने विविध उपक्रम,योजना, कार्यक्रम राबविले जातात. त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद महापालिकेच्या वार्षिक अर्थसंकल्पामध्ये करण्यात येते. सन २०२५-२६ पासून विविध कामासाठी लागणारी आर्थिक तरतूद अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करताना संबंधित प्रकल्प, उपक्रमामध्ये पर्यावरणीय दृष्टीकोनातून कोणते मुद्दे, घटक महत्वाचे आहेत ते निश्चित करण्यात येणार आहेत. तसेच निश्चित करण्यात आलेल्या पर्यावरणीय घटकांवर उपाय, योजना करण्यासाठी आवश्यक असणारी आर्थिक तरतूद देखील अर्थसंकल्पामध्ये करण्यात येणार आहे. त्यामुळे आगामी काळात मूळ अर्थसंकल्पासोबतच पर्यावरणीय अर्थसंकल्प देखील प्रसिद्ध केला जाणार असल्याचेही मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा वित्त संचालक प्रवीण जैन यांनी सांगितले.

पर्यावरणीय अर्थसंकल्पासाठी अधिकारी व कर्मचारी यांना आवश्यक असणारे प्रशिक्षण सत्र आज महापालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दि. ४,५ आणि ६ डिसेंबर दरम्यान आकुर्डी प्राधिकरण येथील ग.दि.माडगुळकर नाट्यगृह येथे संपन्न होत आहे.

# मावळातील तरुणांचे अनोखे साहस

## अजित पवार मुख्यमंत्री आणि सुनील शेळके मंत्री व्हावेत यासाठी साहस

**पिंपरी | प्रतिनिधी**

अजितदादा पवार मुख्यमंत्री व्हावे यासाठी मावळातील तरुणांनी अनोख्या पद्धतीने लक्ष वेधले आहे. अजितदादा पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावेत व मावळचे आमदार सुनिल शेळके यांना मंत्रीमंडळात स्थान मिळावे अशा आशयाचा तीस फुटाचा मोठा बॅनर ८०० फुट उंचीच्या नागफणी कड्यावरून झळकावून सर्वांचे लक्ष वेधले आहे.



राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल 23 नोव्हेंबरला जाहीर झाला असून महायुतीला बहुमत मिळालं आहे. अशातच मुख्यमंत्री पदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार, अशी चर्चा राज्यभर रंगली असतानाच अजितदादा भावी मुख्यमंत्री व्हावेत अशी इच्छा त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

नागफणी कडा हा पुणे जिल्ह्यातील लोणावळा लगतच्या घनदाट जंगलातील खड्या कातळ खडकाचा, चढाईला अतिशय दुर्गम व कठीण आहे. असा हा कठीण असलेला ड्युक्स नोज उर्फ नागफणी कडा. गिर्यारोहणाचा अनुभव आणि सुरक्षित साधनांच्या साह्याशिवाय या सुळक्यावरील चढाई अवघड मानली जाते,परंतु हा अवघड सुळका सर करून विकासाची दूरदृष्टी असलेल्या नेत्यांना मानाचे स्थान मिळावे हे ध्येय उराशी बाळगून जिद्द आणि धाडसाच्या जोरावर या युवा गिर्यारोहकांनी नागफणी सुळक्यावर बॅनर झळकावला आहे. या मोहिमेत मावळातील नारायण मालपोटे, नितीन पिंगळे, विशाल गोपाळे, अजित गोपाळे व पांडुरंग जाचक यांनी सहभाग घेतला होता.

आपल्या सह्याद्रीच्या पर्वतरांगेत गिर्यारोहकांना खुणावणारे अनेक सुळके आपण पाहतो.या अवघड सुळक्यांवर गिर्यारोहक निसर्गाशी सामना करीत यशस्वीरीत्या चढाई करतात. अशाच सुमारे ८०० फूट उंचीच्या नागफणी सुळक्यावर मावळातील तरुणांनी यशस्वीरित्या चढाई करून वाऱ्याच्या वेगाचा सामना करीत ३० फुटी मोठा बॅनर झळकावला आहे.

# पिंपरीमध्ये ईव्हीएम विरोधात संभाजी ब्रिगेडच्या वतीने धरणे आंदोलन

## आंबेडकर चौकात संभाजी ब्रिगेडच्या वतीने ईव्हीएम विरोधात धरणे आंदोलन केले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात संभाजी ब्रिगेडच्या वतीने ईव्हीएम विरोधात धरणे आंदोलन केले. यावेळी ईव्हीएम हटवून मतपत्रिकेवर मतदान घेण्याची मागणी संघटनेच्या वतीने केली. 'चौकशी न झाल्यास जनतेतून मोठा उठाव होऊन ईव्हीएम हटविले जाईल,' असा सूर आंदोलनातील विविध सामाजिक पदाधिकाऱ्यांनी घेतला.



ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, माजी नगरसेवक मारुती भापकर, मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रकाश जाधव, धम्मराज साळवे, शांताराम खुडे, रोहनाज शेख, प्रदीप पवार, संजीवनी पुराणिक, सीपीएमचे सचिन देसाई, संतोष शिंदे, शरद थोरात, आदींनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

शहराध्यक्ष सतीश काळे म्हणाले की, लोकशाहीमध्ये जनता सर्वश्रेष्ठ आहे. जनतेला अपेक्षित असलेले मुद्दे, शासकीय धोरणे राबविण्याबरोबरच जनताच या देशातील सत्तेत बसणाऱ्या लोकप्रतिनिधींचे भवितव्य ठरवत आहे. मात्र, सत्तेचा गैरवापर करून जेव्हा जनतेच्या हातातून अनेक गोष्टी घालविल्या जातात. तेव्हा जनतेमध्ये मोठा असंतोष निर्माण होतो. निकालाची योग्य चौकशी करावी.

या आंदोलनात संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गणेश दहिभाते, जिल्हा कार्याध्यक्ष लहुजी लांडगे, शहर कार्याध्यक्ष विशाल मिठे, उपाध्यक्ष मुकेश बोबडे, सचिव बाळासाहेब मुळे, मराठा सेवा संघाचे वसंत पाटील, अनिल गाडे, आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते. याशिवाय आंदोलनामध्ये विविध सामाजिक पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

# विद्यापीठातील भरतीला ब्रेक; पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत भरती प्रक्रिया न राबवण्याचे आदेश

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह राज्यातील विविध विद्यापीठांमधील प्राध्यापकांच्या रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली.

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या विविध पदांच्या भरती प्रक्रियेला मुहूर्त सापडलेला नव्हता. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह राज्यातील विविध विद्यापीठांमधील प्राध्यापकांच्या रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली. पुणे विद्यापीठाकडे १११ पदांसाठी सहा हजाराहून अधिक अर्ज प्राप्त झाले. त्या अर्जांची छाननी सुरू असतानाच पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत विद्यापीठाने प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवू नये, असे पत्र राज्यपाल कार्यालयाकडून विद्यापीठाला पाठवण्यात आले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह राज्यातील विविध विद्यापीठांमधील विभागामधील तसेच संलग्न महाविद्यालयांमधील रिक्त असलेल्या प्राध्यापकपदाची भरती प्रक्रिया सुरू आहे. हजारो उमेदवार विद्यापीठाकडून मुलाखतीसाठी केव्हा बोलावले जाते, याच्या प्रतिक्षेत आहेत. असे असताना राज्यपाल कार्यालयातून पाठवण्यात आलेल्या या या पत्रामुळे विद्यापीठातील पदांच्या भरतीला ब्रेक लागला आहे.



### भरती प्रक्रियेत नाही पारदर्शकता

» महाराष्ट्र लोकसेवा आयोगाप्रमाणे प्राध्यापक भरती प्रक्रियेत पारदर्शकता यावी, अशी मागणी वारंवार करण्यात आली. परंतु, त्या दृष्टीने उपाययोजना झाल्या नाहीत. प्राध्यापक भरती करण्यासाठी विद्यापीठ कायद्यामध्ये विशिष्ट तरतूद करण्यात आलेली आहे. भरती प्रक्रियेमध्ये बदल करण्यापूर्वी विद्यापीठ कायद्यात बदल करावा लागेल. त्यामुळे राज्यपाल कार्यालयाकडून प्राध्यापक भरतीबाबत कोणता निर्णय घेतला जाणार, याबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे

> प्राध्यापक भरतीसंदर्भात पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत विद्यापीठाने प्राध्यापक भरती करू नये, अशा आशयाचे पत्र राज्यपाल कार्यालयाकडून विद्यापीठाला प्राप्त झाले आहे..
> - डॉ. ज्योती भाकरे, प्रभारी कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांनी विद्यापीठाला या संदर्भातील पत्र मिळाले असल्याबाबत दुजोरा दिला आहे.

महाविद्यालयांसोबतच विद्यापीठामध्येसुद्धा पूर्ण वेळ प्राध्यापक नसल्याने कंत्राटी तत्त्वावर प्राध्यापकांची भरती करावी लागली आहे. परंतु पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत विद्यापीठाने प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवू नये, असे पत्र राज्यपाल कार्यालयाकडून विद्यापीठाला पाठविण्यात आले आहे.

विद्यापीठातील अनेक विभाग तसेच संलग्न महाविद्यालयांना प्राध्यापक नसल्याने अडचणी येत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन येत्या फेब्रुवारी महिन्यात होणार आहे. विद्यापीठाकडे उपलब्ध असणाऱ्या मनुष्यबळाला नॅक मूल्यांकनात गुण दिले जातात. राज्यपाल कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पत्रामुळे विद्यापीठाला भरती प्रक्रिया थांबवावी लागणार असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्राध्यापक भरतीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांना आणखी काही महिने प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे बोलले जात आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या विविध पदांच्या भरती प्रक्रियेला मुहूर्त सापडलेला नव्हता. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह राज्यातील विविध विद्यापीठांमधील प्राध्यापकांच्या रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली.

# देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन लवकरच धावणार

## भारतीय रेल्वे प्रशासन या प्रकल्पासाठी आशावादी आहे.झाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन लवकरच धावताना दिसणार आहे. विशेष म्हणजे, भारतीय रेल्वे प्रशासन या प्रकल्पासाठी आशावादी आहे.



हरियाणातील जिंद आणि सोनीपत रेल्वे स्थानकादरम्यान ही ट्रेन धावण्याचे निश्चित आहे. लखनौ येथील रीसर्च डिझाइन अँड स्टँडर्ड ऑर्गनायझेशनने (आरडीएसओ) या ट्रेनची रचना केली आहे. डीझेल किंवा ईलेक्ट्रिक उर्जेचा वापर न करता ही ट्रेन पूर्णपणे हायड्रोजनच्या शक्तीवर धावणार आहे.

या ट्रेनसाठी 2,800 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ट्रेनमध्ये २१० किलोवॅट बॅटरी, फ्युअल सेल आणि तीन हायड्रोजन सिलिंडर्स असतील. चालकाच्या मागील बाजूस कंट्रोल पॅनेल असेल.

या ट्रेनमध्ये 8 प्रवासी डबे असतील. म्हणजेच एकावेळी सुमारे 2638 जण प्रवास करू शकतील. त्याचा वेग ताशी 110 किलोमीटर असेल. प्रवासी डब्याशिवाय हायड्रोजन सिलिंडरसाठी 2 डबे असतील. चेन्नईतील इंटिग्रल कोच फॅक्टरी येथे त्याचे एकत्रीकरणाचे काम सुरू आहे.

आतापर्यंत हायड्रोजन इंधनावर धावणाऱ्या ट्रेन फक्त जर्मनी, स्वित्झर्लंड आणि चीनमध्ये बनवल्या गेल्या. परंतु हा प्र योग फारसा यशस्वी झालेला नाही. सध्या अशी ट्रेन फक्त जर्मनीत धावत असून तिला दोन डबे आहेत. भारतातील ट्रेन काहीशी वेगळी आणि यशस्वी ठरण्याची अपेक्षा आहे.

"हायड्रोजन इंधनावर आपल्याला प्रभुत्व मिळवायचे आहे. इतर देश एक हजार अश्वशक्ती क्षमतेचा वापर करत आहेत. भारतीय तंत्रज्ञ १२०० अश्वशक्ती क्षमतेवर काम करत आहेत. देशातील बोटी, आणि ट्रकमध्येही या इंधनाचा वापर व्हावा, अशी आमची इच्छा आहे."

फायदे

– या ट्रेनमुळे कार्बन उत्सर्जन कमी होईल. ज्यामुळे हरित आणि शाश्वत वाहतुकीला चालना मिळेल.

– भारताच्या रेल्वे व्यवस्थेचे आधुनिकीकरण आणि आत्मनिर्भर भारत मोहिमेमध्ये हे महत्त्वपूर्ण योगदान असेल.

– हायड्रोजनकडे भविष्यातील ऊर्जा म्हणून पाहिले जात आहे.

– ही ट्रेन भारतातील हायड्रोजन-आधारित वाहतूक व्यवस्थेला प्रोत्साहन देईल..

# आंतरराष्ट्रीय समितीकडून 'ईव्हीएम'ची तपासणी करा : पृथ्वीराज चव्हाण

## असे मत माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केले

**पुणे | प्रतिनिधी**



विधानसभा निवडणुकीत मतदानातील तफावतीबाबत चर्चा सुरू आहे. आता 'ईव्हीएम'वर जनतेचा विश्वास राहिलेला नाही. निवडणूक आयोगाने आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची समिती नियुक्त करुन "ईव्हीएम'ची तपासणी केली पाहिजे. तरच सत्य बाहेर येईल, असे मत माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केले. आगामी निवडणुका मतपत्रिकेचा म्हणजेच बॅलेट पेपरचा वापरण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, असेही चव्हाण म्हणाले.

लोकशाही वाचवण्यासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांनी आंदोलन केले. आंदोलनाला काँग्रेसतर्फे पाठिंबा देण्यासाठी चव्हाण यांनी आढाव यांची भेट घेतली. त्यानंतर चव्हाण यांनी माध्यमांशी संवाद साधला. महाविकास आघाडीकडून निवडणूक आयोगावर टीका करण्याचा धडाका लावला. अनेक पराभूत उमेदवारांनी आता फेर मतमोजणीची मागणीही केली आहे. त्यावर चव्हाण यांनीही भाष्य केले आहे.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला यश मिळाले. मात्र, विधानसभेला इतका मोठा बदल होईल असे वाटले नव्हते. प्रत्येकाला राज्यातील सत्ता बदलाबाबत आत्मविश्वास होता. पक्षफुटीचा जो विषय झाला त्याचा काहीच फरक पडला नाही, यावरही विश्वास बसत नाही. देशात लोकशाही आहे. निवडणूक फ्री आणि फेअर होणं आवश्यक आहे, असे चव्हाण यांनी सांगितले.

अनेक गावांत मतदारांपेक्षा मतदानाचा टक्का अधिक असल्याचे समोर आल्याने विरोधकांनी संशय व्यक्त केला आहे. महायुतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवडणुका लढल्या. त्यामुळे शिंदे यांना भाजपने फसवू नये, असेही चव्हाण म्हणाले.

# मतदान टक्कावाढीसाठी कोटीचा खर्च

## जनजागृतीच्या विविध उपक्रमांमुळे मतदानाचा टक्का वाढल्याचा अधिकाऱ्यांचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी मतदारसंघातील मतदानाचा टक्का वाढावा म्हणून महापालिकेने एक कोटीहून अधिकचा खर्च केला आहे. जनजागृतीच्या विविध उपक्रमांमुळे मतदानाचा टक्का वाढल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे.

शहरातील जास्तीत जास्त मतदारांनी घराबाहेर पडून मतदान करावे आणि मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी महापालिकेने स्वीप विभाग तयार केला होता. त्याद्वारे सर्वसमावेशक आराखडा तयार करून शहरभर जनजागृती केली. त्यापैकी होर्डिंगवर जाहिराती लावण्यात आल्या. तसेच, गर्दी व चौकांच्या ठिकाणी फ्लेक्स व पोस्टर लावण्यात आली.

शहरातील व्हीएमडीवर मतदान करण्याबाबत जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या. सोशल मीडियासह रेडिओवरही जाहिराती करण्यात आल्या. शहरातील मोठ्या हाऊसिंग सोसायटीच्या बाहेरही फ्लेक्स झळवकले. मतदान जनजागृतीसाठी व्हिंटेज कार व बाईक रॅली तसेच दिव्यांग रॅलीही काढण्यात आली. निगडीतील इंदिरा गांधी उद्यान, दुर्गादेवी टेकडी येथे वॉकेथॉन उपक्रम राबविण्यात आला. त्यात अभिनेत्री श्रेया बुगडे हिची खास उपस्थिती होती.




हाऊसिंग सोसायटी फेडरेशन व पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक संघ, कामगार संघटना, महिला बचत गट आदींची बैठका घेऊन मतदार जनजागृती करण्यात आली. मुख्य चौक, उद्याने, क्रीडांगणे, महाविद्यालये, हाऊसिंग सोसायटी, मॉल, चित्रपटगृहे, व्यायामशाळा, व्यावसायिक आस्थापना, कंपन्या, झोपडपट्टी, मजूर अड्डा, रुग्णालये व औद्योगिक कंपन्या आदी ठिकाणांवर मतदार जनजागृतीचे उपक्रम घेण्यात आले.

पथनाट्याद्वारे शहरातील मॉल, बाजारपेठा, मंडई, महाविद्यालय येथे जनजागृती करण्यात आली. एलईडी व्हॅन फिरविण्यात आली. रिक्षाच्या हुडवर जाहिराती लावण्यात आल्या होत्या. वेगवेगळ्या स्पर्धाही आयोजित केल्या गेल्या. मतदान केंद्रांवर 5 लाख पाण्याच्या बाटल्या पुरविण्यात आला. उद्यान विभागाकडून 15 मतदान केंद्रांवर रोपांच्या कुंड्यांचा वापर करून सजावट करण्यात आली होती.

त्याचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. काही केंद्रांवर रांगोळी काढण्यात आली होती. तसेच, मतदान केंद्रांवर गर्दी नियंत्रित करण्यासाठी महापालिकेकडून सुरक्षारक्षक व एमएफएसचे जवान तैनात करण्यात आले होते. आरोग्य विभागाचे पथकेही नेमण्यात आली होती. तसेच, सफाई कर्मचारी व स्वयंसेवक नेमले होते. महापालिकेकडून पार्किंगची सोय करण्यात आली होती.

### निवडणूक कार्यालयांकडून मतदारजागृती

» शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून मतदारसंघात मतदार जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. प्रत्येक मतदारसंघात अनेक उपक्रम घेण्यात आले. मेळावे, मजूर अड्डा, विवाह सोहळा, महाविद्यालय आदी ठिकाणी कार्यक्रम झाले. तसेच, महापालिकेने असे कार्यक्रम राबविले.

महापालिकेच्या करसंकलन, समाज विकास, माहिती व जनसंपर्क तसेच, उद्यान विभागाकडून तब्बल महिन्याभर वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. त्यासाठी एक कोटीपेक्षा अधिकचा खर्च महापालिकेकडून करण्यात आला आहे. त्यासाठी महापालिकेने 75 लाखांची तरतूद केली होती. या जनजागृती मोहिमेमुळे मतदानाचा टक्का वाढला आहे, असा दावा महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. दरम्यान, मे महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीत मतदार जनजागृतीवर 40 लाखांपेक्षा अधिकचा खर्च करण्यात आला होता.

### पालिकेच्या जनजागृती कार्यक्रमास मतदारांचा प्रतिसाद

भारत निवडणूक आयोग आणि जिल्हा निवडणूक कार्यालयाच्या सूचनेवरून पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरात मतदार जनजागृती उपक्रम राबविला. संपूर्ण शहरात महिन्याभर वेगवेगळे मतदार जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. व्हिटेज व बाईक रॅली तसेच, वॉकेथॉन कार्यक्रमास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

हाऊसिंग सोसायटीतील मतदान वाढावे म्हणून तेथेही जनजागृती करण्यात आली. शॉपिंग मॉलमध्ये आयकॉन स्पर्धा घेतली. मतदान केंद्रांवर मतदारांची गैरसोय होऊ नये, म्हणून अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. परिणामी, यंदा मतदानांची टक्केवारी वाढली आहे, असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त तथा स्वीप नोडल विजयकुमार खोराटे यांनी सांगितले.

# राहुल कलाटेंचा ईव्हीएम मशीन पडताळणीसाठी अर्ज

## चिंचवड मधून आमदार शंकर जगताप विरुद्ध महाविकास आघाडीचे राहुल कलाटे असा सामना रंगला होता

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील शरद पवार गटाचे राहुल कलाटे यांनी ईव्हीएम मशीन पडताळणीसाठी अर्ज केला आहे. चिंचवड मधून आमदार शंकर जगताप विरुद्ध महाविकास आघाडीचे राहुल कलाटे असा सामना रंगला होता. चिंचवडमधून जगताप हे एक लाखांपेक्षा अधिक मताधिक्याने विजयी झाले होते. यावर आक्षेप घेत राहुल कलाटे यांनी ईव्हीएम पडताळणीसाठी अर्ज केला आहे.



राहुल कलाटे यांनी काही मुद्दे मांडले आहेत. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील निवडणूक होत असताना अवघ्या महाराष्ट्रात निवडणूक होत होती. चिंचवड विधानसभा मतदारसंघात राज्यातील विविध ठिकाणी राहणाऱ्या मतदारांची संख्या जास्त आहे. चिंचवड मधील हजारो मतदार हे त्यांच्या मूळ गावी मतदानासाठी गेले तरी देखील चिंचवड मध्ये मतदानाचा टक्का वाढला कसा? असा प्रश्न राहुल कलाटे यांनी उपस्थित करत आक्षेप घेतला असून ईव्हीएम पडताळणीसाठी अर्ज केला आहे.

एक बूथ साठी जीएसटीसह तब्बल ४७ हजार २०० रुपये मोजले आहेत. अशी एकूण २५ बूथसाठी ११ लाख ८० हजार रुपये त्यांनी भरले आहेत. अशी माहिती राहुल कलाटे यांनी दिली आहे. अर्ज करून राहुल कलाटे यांना तीन – चार दिवस झाले असले तरी अद्याप तरी निवडणूक आयोग कडून त्यांना उत्तर मिळालेलं नाही. ४५ दिवसात उत्तर मिळणं अपेक्षित असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. त्यामुळे ते निवडणूक आयोगाच्या उत्तराची प्रतीक्षा करत आहेत.

# शहराच्या हवेची गुणवत्ता खराब गटात

## भूमकर चौक, विद्यापीठ चौक, वाकड सर्वाधिक प्रदूषित अतिसूक्ष्म धूलिकणांचे (2.5) प्रमाण वाढले



**पुणे | प्रतिनिधी**

रविवारी शहराच्या हवेची गुणवत्ता खराब गटात गणली गेली. दिवसभर वाहतुकीची वर्दळ वाढली होती. त्यात ढगाळ वातावरण तयार झाल्याने शहरातील भूमकर चौक, विद्यापीठ चौक, वाकड या भागांतील हवा सर्वाधिक प्रदूषित होती.

शहराची हवा दिवसेंदिवस खराब गटात जात आहे. रविवारी शहराच्या सर्वच भागात वाहनांची गर्दी वाढल्याने हवेची गुणवत्ता खराब गटात गेली. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर पुण्याचे आकाश तांबड्या अन् पिवळ्या रंगांत दिसत होते. याचा अर्थ शहराची हवा प्रदूषित होत आहे, असा होतो. तांबड्या रंगात धायरी जवळील भूमकर चौक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक, पिंपरी-चिंचवड, वाकड, निगडी, चाकण, मोशी, खडकी हे भाग होते.

तांबडा रंग म्हणजे हवा खराब गटात आहे. तर शहरातील कात्रज, शिवाजीनगर, कर्वे रस्ता, पाषाण, स्वारगेट, लोहगाव, आळंदी रस्ता, बाणेर हे भाग पिवळ्या रंगात दाखवले होते. याचा अर्थ येथील हवा मध्यम गटात म्हणजे आजारी लोकांसाठी खराब असल्याचा अलर्ट दिला होता.

शहराच्या किमान तापमानात 3 ते 4 अंशांनी वाढ झाल्याने रविवारपासून गारठा किंचित कमी झाला. मात्र, बोचरे वारे अजून दोन दिवस मुक्कामी राहणार असल्याने रात्री अन् पहाटेचा गारवा कायम राहील.

### कमाल तापमान अजूनही कमीच

» शहरातील कमाल व किमान तापमानात मोठी घट झाली होती. किमान तापमानात वाढ होत आहे. मात्र, कमाल तापमान अजूनही सरासरी 27 ते 28 अंशांवर आहे. यातही दोन दिवसांत हळुवार वाढ होऊन थंडी गायब होणार आहे.

बुधवारपासून मात्र शहरातील थंडी पूर्ण कमी होण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

25 नोव्हेंबरपासून शहरात किमान तापमानात सातत्याने घट होताना दिसत होती. यंदाच्या हंगामातील सर्वात कमी तापमान 29 नोव्हेंबर रोजी 9.2 अंश इतकी झाली, तर शनिवारपर्यंत शहराचे किमान तापमान 9.8 अंशांवर होते. मात्र, रविवारी शिवाजीनगरच्या तापमानात 4 अंशांनी वाढ होऊन ते 13.4 अंशांवर गेले, तर एनडीएचा पारा शनिवारी 8.2 अंशांवर होता. तो रविवारी 12.2 अंशांवर गेला.

### रविवारचे किमान तापमान

» पुणे 13.4, पाषाण 13.3, लोहेगाव15.3, चिंचवड17.7, लवळे 17.5, मगरपट्टा 18, एनडीए 12.2, कोरेगाव पार्क 16.

# पुण्यात फळभाज्यांची आवक वाढली

## ढोबळीसह हिरवी मिरची, आले, फ्लॉवरचे दर दहा ते वीस टक्क्यांनी उतरले



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केट यार्डातील तरकारी बाजारात राज्यासह परराज्यांतून होणारी फळभाज्यांची आवक वाढली आहे. रविवारी (दि. 1) 100 ट्रकमधून शेतमालाची आवक झाली. मागील आठवड्याच्या तुलनेत त्यामध्ये दहा ट्रकने वाढ झाली. बाजारात दाखल झालेल्या मालाच्या तुलनेत मागणी कमी पडल्याने मिरची, आले व फ्लॉवरचे दर दहा ते वीस टक्क्यांनी उतरले. मागणी आणि पुरवठा यातील समतोलामुळे उर्वरित फळभाज्यांचे भाव मागील आठवड्याच्या तुलनेत स्थिर राहिले.

परराज्यांतून झालेल्या आवकमध्ये कर्नाटक, गुजरात आणि आंध्र प्रदेश येथून हिरवी मिरची 14 ते 15 टेम्पो, कर्नाटक आणि गुजरात येथून कोबी 4 ते 5 टेम्पो, कर्नाटक येथून पावटा 2 टेम्पो, आंध्र प्रदेश, तमिळनाडू येथून शेवगा 2 टेम्पो, राजस्थान येथून 7 ते 8 टेम्पो गाजर, कर्नाटक आणि गुजरात येथून घेवडा 4 ते 5 टेम्पो, गुजरात येथून 4 ते 5 टेम्पो भुईमूग शेंग, मध्य प्रदेश येथून 12 ते 13 ट्रक मटार, तमिळनाडू येथून 2 टेम्पो तोतापुरी कैरी, मध्य प्रदेश येथून लसणाची सुमारे 9 ते 10 टेम्पो इतकी आवक झाली होती.

स्थानिक भागातून झालेल्या आवकमध्ये सातारी आले सुमारे 550 ते 600 गोणी, भेंडी 5 ते 6 टेम्पो, गवार 5 ते 6 टेम्पो, टोमॅटो 7 ते 8 हजार पेटी, हिरवी मिरची 4 ते 5 टेम्पो, काकडी 7 ते 8 टेम्पो, फ्लॉवर 10 ते 12 टेम्पो, कोबी 5 ते 6 टेम्पो, सिमला मिरची 10 ते 12 टेम्पो, भुईमूग शेंग 40 ते 50 गोणी, तांबडा भोपळा 10 ते 12 टेम्पो, कांदा सुमारे 100 ते 125 ट्रक, इंदौर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा 40 ते 45 ट्रक आवक झाल्याची माहिती ज्येष्ठ अडतदार विलास भुजबळ यांनी दिली.

### मेथी, शेपू, कांदापात, मुळे आणि चुक्याच्या भावात घट

» मार्केट यार्डातील तरकारी विभागात पालेभाज्यांची आवक वाढली आहे. त्या तुलनेत मागणी कमी असल्यामुळे पालेभाज्यांच्या भावात घट झाली आहे. सर्वाधिक मेथीच्या भावात घाऊक बाजारात जुडीमागे 9 रुपयांनी घट झाली आहे. तर शेपूच्या भावात 8 रुपये, कांदापात, मुळे, पालकच्या भावात प्रत्येकी 5 रुपये आणि चुकाच्या भावात 2 रुपयांनी घसरण झाली आहे. मागणी आणि पुरवठा यातील समतोलामुळे उर्वरित पालेभाज्यांचे भाव मागील आठवड्याच्या तुलनेत स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. दरम्यान हरभऱ्याचा हंगाम सुरू झाला आहे. 6 ते 7 हजार जुडी आवक झाली असून, घाऊक बाजारात एका जुडीस दर्जानुसार 5 ते 15 रुपये भाव मिळाला. मार्केटयार्डातील घाऊक बाजारात रविवारी (दि. 1) कोथिंबिरीची सुमारे दीड लाख जुडी आवक झाली. जी गेल्या आठवड्यात सव्वा लाख जुडी होती. तर मेथीची आवक दुप्पटीने वाढली आहे. मागील आठवड्यात 40 हजार असलेल्या जुडींची आवक आज 80 हजार नोंदविण्यात आली.